**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Issue 40 , Vol. 2 (Indexed) March. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|


**Impact Factor – 7.139 ISSN – 2319-8648**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**March 2021 Special Issue- 40 Vol. 2**

**Chief Editor**

**Mr. Arun B. Godam**

**Shaurya Publication , Latur**



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli

CURRENT GLOBAL REVIEWER

| Issue 40 , Vol. 2 (Indexed) March. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# Index


1. हबीब तनवीर कृत नाटक 'आगरा बाज़ार' पर नजीर का प्रभाव — 6
   श्री नागेश सदानंदे, डॉ. बाळसाहेब सोनवणे
2. उपन्यास 'अम्रत और विष' आधुनिक समाज का यथार्थवादी दस्तावेज — 12
   प्रा.डॉ.शहाजी बाला चव्हाण
3. छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण — 15
   डॉ. कांबळे आर. एस.
4. मराठवाडा विभागातील बॉल-बॅडमिंटन या खेळाची सद्यस्थिती व भवितव्य. — 18
   प्रा.डॉ.राजेंद्र सुर्यवंशी
5. छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण — 21
   डॉ. कांबळे आर. एस.
6. धर्मनिरपेक्षता और पंडित दीनदयाल उपाध्याय का राष्ट्रवादी चिंतन — 24
   बाबूलाल मीणा, डॉ विभा कौशिक
7. लोकल फॉर वोकल कोविड–19 के संदर्भ में — 27
   डॉ. देवेश रंजन त्रिपाठी, डॉ. अदिती गोस्वामी
8. देगलूर तालुक्यातील तडखेल, खानापूर, नरंगल, येरगी, देवापूर आणि बेंम्बरा येथील शिलालेखांचा अभ्यास — 30
   सौ.नागेश्वर अनिता मोहनराव
9. गोविंद (गोपाळ) गणपत महार व छत्रपती संभाजी महाराज — 34
   प्रा.डॉ. शिवाजी गाढे
10. पर्यावरणात्मक कृषीक्षेत्राचा आर्थिक विकास एक अभ्यास — 39
    प्रा. डॉ. सर्जेराव गंगाधर गोल्डे
11. पूर्व विदर्भातील आदिवासी समाजाचे अध्ययन केंद्र गोटूल / युवागृह — 45
    प्रा. डॉ. आनंद के. भोयर,
12. प्रवासी साहित्यकार राजेंद्र यादव के ललित साहित्य में राम कथा का व्यवहारिक पक्ष — 51
    अनुपमा तिवारी
13. प्राचीन काळातील तेर — 54
    अनिल तानाजी जाधवर
14. 2014 लातूर लोकसभा (अनु.जाती) मतदारसंघाची निवडणूक — 59
    जितेंद्र वामराव गायकवाड
15. बालकामगार : एक सिंहावलोकन — 63
    प्रा.डॉ. डी.एन. दामावले




PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli Dist Hingoli



Issue 40 , Vol. 2 (Indexed) March. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

16. 'अण्णा भाऊ साठे : जीवन व कार्य' 66
प्रा. डॉ. भुजंग पाटील

17. 'आळ आणि काळ : अर्थशास्त्रीय विश्लेषण' 70
प्रा. डॉ. शिवराज पाटील,

18. फकिरा: संघर्षाची कथा 74
प्रा. प्रशांत कांबळे

19. 'महात्मा फुले आणि स्त्री शिक्षण' 77
प्रा. डॉ. रजनी अ. बोरोळे

20. 'वारणेचा वाघ: समाजशास्त्रीय विश्लेषण' 80
प्रा. डॉ. एस. पी. घायाळ,

21. 'कोरोना काळातील कविता' 83
प्रा. डॉ. गोविंद काळे

22. विधीमंडळ कामकाजातील प्रश्नोत्तराचा तास : लोकप्रतिनिधींचे प्रमुख आयुध 88
प्रा.डॉ.एस यू ढाले

23. आदिवासी जमातीच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास 92
डॉ.एन.आर. हरगूळे



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli Dist Hingoli

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue 40 , Vol. 2 (Indexed) March. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# विधीमंडळ कामकाजातील प्रश्नोत्तराचा तास : लोकप्रतिनिधींचे प्रमुख आयुध

**प्रा.डॉ.एस यू ढाले**
राज्यशास्त्र विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

---

**प्रस्तावना** :

भारताने ब्रिटिशांच्या धर्तीवर संसदीय लोकशाहीचा स्विकार केला आहे. संसदीय लोकशाही मध्ये जबाबदारीला अतिशय महत्वाचे स्थान असते. संसदीय लोकशाहीत कार्यकारी मंडळ हे कायदेमंडळाला जबाबदार असते. आणि कायदेमंडळ हे लोकांना जबाबदार असते. जोपर्यंत कायदेमंडळाचा (लोकसभा व विधानसभा) पाठिंबा कार्यकारी मंडळाला असतो तोपर्यंत कार्यकारी मंडळ सत्तेवर राहू शकते. तसेच जोपर्यंत जनतेचा पाठिंबा कायदेमंडळातील सदस्यांना असतो तो पर्यंत ते सत्तेवर राहतात. नाही तर पुढच्या निवडणुकीला त्यांना पायउतार व्हावे लागते. जनतेचे प्रश्न, समस्या सोडविण्यासाठी कायदेमंडळाने जनताभिमुख, लोकविकासाचे कायदे करावे अशी जनतेची अपेक्षा असते. तर कार्यकारी मंडळाने त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन जनताभिमुख निर्णय घेणे अपेक्षित आहे. जनताभिमुख राज्यकारभार व्हावा यासाठी देशातील राज्यकारभारावर लोकशाहीचे नियंत्रण व देखरेखीसाठी विकसित केलेले वेगवेगळे मार्ग, तंत्रे, साधने यांना संसदीय आयुधे (Devices of Parliamentary Democracy) असे म्हणतात. लोकप्रतिनिधींना सरकारच्या/शासनाच्या कारभारावर प्रभावी नियंत्रण असण्याच्या दृष्टीने प्रशासकीय कामाची माहीती घेणे, प्रशासनातील त्रुटी व गैरव्यवहार शोधून काढणे व योग्य त्या उपाययोजना सुचविणे, शासनाला दिशा देणे व शासनाला धोरणात्मक मार्गदर्शन करणे हा संसद व विधिमंडळाचा घटनात्मक अधिकार आहे. यासाठी लोकप्रतिनिधी, तारांकित प्रश्न, अतांराकित प्रश्न, अल्पसूचना प्रश्न, प्रस्ताव, ठराव, स्थगन प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, अर्धातास चर्चा, अल्पकालीन चर्चा, अंतिम आठवडा प्रस्ताव, अविश्वास प्रस्ताव, विश्वासदर्शक प्रस्ताव इत्यादी आयुधांच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवतात. विधानसभा सदस्यांना विधानसभेतील कामकाजात आपला सहभाग प्रभावीपणे करण्यासाठी या संसदीय आयुधांचा वेळोवेळी वापर करावा लागतो. आपल्या मतदार संघातील प्रश्नांना योग्य न्याय देण्यासाठी, समस्यांचे निराकरण करण्यासाठी, सार्वजनिक हित साध्य करण्यासाठी या आयुधांचा वापर करुन सत्तारुढ पक्षाला जाब विचारुन त्यांना सत्तारुढ पक्षाची जाणीव करुन दिले जाते. मंत्रीमंडळावर नियंत्रण ठेवणे, शासकीय कामाचे परिक्षण करणे, गैरप्रकाराबाबत जाब विचारणे, वेळप्रसंगी सत्ताच्यूत करणे यामुळे नोकरशाही पध्दतीचा विकास या धोक्याला मर्यादा आणून जबाबदार शासनपध्दतीची भूमिका वाढते. विधानसभा सदस्यांच्या कामकाजातील यश हे प्रभावी संसदीय आयुधांच्या वापरावर अवलंबून असते.[1] हे लक्षात घेउन प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी **विधीमंडळ कामकाजातील प्रश्नोत्तराचा तास लोकप्रतिनिधींचे प्रमुख आयुध - एक अभ्यास** हा विषय निश्चित करुन लिखान केले आहे.

**उद्देश** :

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी पुढील उद्देश निश्चित करण्यात आले आहेत.

1. संसदीय लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींना मिळालेली प्रमुख आयुध म्हणून प्रश्नोत्तराचा तासाचा अभ्यास करणे.
2. प्रश्नोत्तर तासाच्या माध्यमातून विधिमंडळ सदस्य हे राज्यसरकार व नोकरशाहीवर प्रभावी नियंत्रण ठेवू शकतात.

**गृहितके** :

1. संसदीय लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींना मिळालेली प्रमुख आयुध म्हणून प्रश्नोत्तराचा तास महत्वाचा आहे.
2. प्रश्नोत्तर तासाच्या माध्यमातून विधिमंडळ सदस्य हे राज्य सरकार व नोकरशाहीवर प्रभावी नियंत्रण ठेवू शकतात.

**प्रश्नोत्तराचा तास**

संसदीय लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींना मिळालेली प्रमुख आयुध म्हणून प्रथमत: प्रश्नोत्तराच्या तासाचा उल्लेख करावा लागतो. संसद व घटकराज्यांच्या विधिमंडळाच्या कामकाजाची सुरवात ही प्रश्नोत्तराच्या तासाने होते. प्रश्नोत्तराच्या तासाचा प्रारंभ हा आपणास इंग्लंडमध्ये झाल्याचे पाहावयास मिळते. इ.स. 1721 मध्ये ब्रिटिश पार्लमेंटमध्ये पहिला प्रश्न विचारला गेला. उत्तरोत्तर त्यात वाढ होत गेली. आज जवळपास सर्वच संसदीय लोकशाही देशात प्रश्नोत्तराचा तास अतिशय महत्वाचा समजला जातो. ब्रिटिशांनी सरकारच्या धोरणाची महिती लोकांना व्हावी यासाठी प्रश्न विचारण्याचा



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli Dist Hingoli

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue 40 , Vol. 2 (Indexed) March. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

हक्क कौन्सिलच्या सदस्यांना दिला होता. त्यानूसार 1895 मध्ये प्रथम प्रश्न विचारण्यात आला होता. पुढे मोर्ले मिंटो सुधारणा कायद्यानूसार प्रश्न विचारणाऱ्या सदस्यांला उपप्रश्न विचारण्यात येत असत. 1919 च्या मॉंटग्यू चेम्सफर्ड कायद्याने प्रश्नांची संख्या वाढवून प्रत्येक सदस्यांना पाच प्रश्न विचारण्याचा अधिकार दिला होता. परंतु त्यांना संरक्षण परराष्ट्र या विषयावर प्रश्न विचारता येत नव्हते.[2]

विधानसभेच्या कामकाजाची सुरवात ही प्रश्नोत्तराच्या तासाने होते. प्रत्येक दिवसाचा पहिला तास प्रश्नोत्तराचा असतो. या तासाला बहुतेक सर्व सदस्य हजर राहतात. त्याशिवाय सभागृहाच्या गॅलरीत पत्रकार व प्रेक्षकही उपस्थित राहू शकतात. विधानसभा सदस्य मंत्रीमंडळाला प्रश्न विचारतात. त्या विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देणे मंत्रीमंडळाला बंधनकारक असते. मंत्र्याच्या अधिकार क्षेत्रातील सार्वजनिक बाबी संबंधी प्रश्न विचारले जातात. प्रश्नामधील विषय संबंधीत मंत्र्याच्या अधिकारक्षेत्रात असणे आवश्यक आहे. तसेच प्रश्नाला वस्तुस्थितीचा आधार असणेही आवश्यक आहे. प्रश्न हा सुस्पष्ट, वाचता येण्याजागा, सुसंबंध, मुद्देसूद असावा. प्रश्नात उल्लेखुन केलेले निवेदन कोणी, कोणास व केव्हा दिले याचा स्पष्ट उल्लेख असावा. प्रश्नात उल्लेख केलेल्या घटनेचे संपूर्ण माहीती दिनांकानीशी असावी व अपेक्षित असणारी माहीती कोणत्या कालावधीतील पाहिजे तेही त्यात नमूद केले पाहीजे.[3]

विधिमंडळ सदस्यांनी आपल्या प्रश्नाची सूचना देतांना काही नियमांचे व पथ्याचे पालन करणे आवश्यक आहे. एखादा प्रश्न न्यायप्रविष्ट असेल, महाराष्ट्र विधानसभा नियम 69 नूसार ज्या बाबी राज्यशासन आणि भारत सरकार यांच्या दरम्यान पत्रव्यवहाराचा विषय आहेत अशा बाबी संबंधी वस्तूस्थिती विषयी असेल त्याच्या व्यतिरिक्त कोणताही प्रश्न विचारण्यात येणार नाही आणि त्याचे उत्तर वस्तुस्थितीचे निवेदन करण्यापुरते मर्यादीत असेल. विचारलेल्या प्रश्नात राज्यशासनाची प्रामुख्याने जबाबदारी नसेल. प्रश्न हा व्यक्तिगत स्वरुपाचा असेल, प्रश्नामध्ये विचारलेली माहिती ही पूर्वी विचारलेल्या प्रश्नामध्ये समाविष्ट असेल, प्रश्नाचे स्वरुप संदिग्ध, वादात्मक व शुल्लक असेल तर असे प्रश्न सभापती अस्विकृत करु शकतात किंवा सुधारणा करु शकतात.[4]

प्रश्नोत्तर तासाच्या माध्यमातून विधिमंडळ सदस्य हे राज्यसरकार व नोकरशाहीवर प्रभावी नियंत्रण ठेवू शकतात. सरकारच्या कारभारातील उणीवा, दोष, भ्रष्टाचार उघडकीस आणून जनतेसमोर सरकारला उघडे पाडण्याचे काम या व्दारे केले जाते. सरकारचे धोरणही वेळप्रसंगी बदलले जाते. अनेक मंत्र्यांच्या खात्याच्या चौकशीची मागणी केली जाते. जनमत तयार केले जाते. या बाबत के.व्ही. गिरमे म्हणतात, प्रश्नोत्तराच्या तासाचा दूसरा उद्देश म्हणजे सरकारच्या कारभारात असणाऱ्या विसंगती, कमतरता सभागृहाच्या नजरेस आणणे व सार्वजनिक प्रश्नांबाबत होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणे हा होय. प्रश्नोत्तराच्या तासाचे महत्व सांगतांना ते पुढे म्हणतात, प्रश्नोत्तराचा तास म्हणजे ओसाड वालुकामय प्रदेशात हिरवळीचे अस्तित्व होय.[5] विधिमंडळामध्ये विचारलेल्या प्रश्नांमुळे सरकारला जनतेच्या समस्या, प्रश्न व अपेक्षा कळतात तर मंत्र्यांच्या उत्तराच्या माध्यमातून जनतेला सरकारचे विविध धोरणे, कार्यक्रम, योजना, एकंदरीत प्रश्नाविषयी मत व बाजूची माहिती मिळते. यामुळे संसदीय लोकशाहीच्या विकासात प्रश्नोत्तराचा तास अतिशय महत्वाचा ठरलेला आहे. केंद्रीय व राज्यविधिमंडळात सामान्यत: जे प्रश्न विचारले जातात त्याचे तीन प्रकार पडतात.

1 **तारांकित प्रश्न** (Starred Questions)

सभागृहात ज्या प्रश्नांची उत्तरे तोंडी दिली जातात त्या प्रश्नांना तारांकित प्रश्न म्हणतात. अशा प्रश्नांवर (*) अशी खुण केली जाते. महाराष्ट्र विधानसभा नियम 74 अन्वये तारांकित प्रश्नाचे उत्तर ज्या तारखेला पाहीजे त्याच्या तीस दिवस अगोदर अशा प्रश्नांची सूचना विधानमंडळ सचिवालयास मिळणे आवश्यक आहे. संबंधीत प्रश्न कोणात्या मंत्र्याला उद्देशून विचारला आहे हे देखील त्या सूचनेत नमूद करावे लागते. म.वि.नि. 77(1) नूसार कोणत्याही सदस्याला एका दिवशी केवळ तीनच तारांकित स्विकृत प्रश्न विचारता येतात. एकच प्रश्न दोन किंवा त्याहून अधिक सदस्यांनी विचारला असेल तेंव्हा त्यापैकी एक प्रश्न स्विकृत केला जातो. त्या सदस्याच्या नावाबरोबर इतर सदस्यांची नावे एकत्र लिहण्यात येतात. तारांकित प्रश्नांची सूचना देतांना सदस्यांना आपण विचारलेल्या तारांकित प्रश्नाची उत्तरे कोणत्या क्रमाने हवी आहेत हे नमूद करावे लागते. तारांकित प्रश्नाची उत्तरे तोंडीच का हवी आहेत याची कारणे सदस्याला जर अध्यक्षाने विचारले तर ते द्यावी लागतात. आणि त्या कारणांचा विचार केल्यानंतर अध्यक्ष त्या प्रश्नांचा समावेश तारांकित किंवा अतारांकित प्रश्नात करतात. सदस्यांना अधिवेशनात तारांकित प्रश्न वेळेवर देता यावेत यासाठी तारांकित प्रश्नाला चक्रानुक्रमाने (रोटेशन ऑर्डर) सचिवालयामार्फत विधानसभा पत्रक भाग दोन व्दारे माहितीसाठी पाठविण्यात येते



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli Dist Hingoli



व मंत्र्यांना उत्तरे देतांना सोईचे जावे म्हणून चक्रानुक्रमात मंत्र्याची गटवार विभागणी केली जाते. अधिवेशनाच्या दरम्यान दर आठवड्याला सोमवार ते शुक्रवारपर्यंत ज्या दिवशी विधानसभेच्या बैठका असतात. त्या प्रत्येक दिवशी सुरवातीच्या एक तास तारांकित प्रश्नोत्तरासाठी उपलब्ध असतो. जर एखाद्या आठवड्यात एखाद्या दिवशो सभागृहाची बैठक रद्द झाली तर त्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांची यादी दुसऱ्या दिवशीच्या सभागृह पटलावर ठेवली जाते. तारांकित प्रश्नावर चर्चा होतांना अध्यक्षाच्या परवानगीने सदस्यांना पुरक प्रश्न विचारुन अधिक स्पष्टीकरण घेता येते.[6]

2 **अल्पसूचना प्रश्न** (Short Notice Questions)

महाराष्ट्र विधानसभा नियम 86(1) नूसार ज्या सदस्यांना एखाद्या तातडीच्या स्वरुपाच्या प्रश्नाचे उत्तर ताबडतोब पाहिजे असेल तर तो त्याबद्दल सचिवास सूचना देईल. अशी सूचना अधिवेशनाच्या किंवा स्थगित केलेल्या अधिवेशनाच्या प्रारंभापूर्वी सात दिवसापेक्षा आधीची नसेल. बृहन्मुंबईच्या बाहेरील असल्यास चौदा (14) दिवसाच्या आत शासनाला उत्तर देणे अपेक्षित आहे. अल्पसूचना प्रश्नाला तारांकित प्रश्नाप्रमाणे पुरवणी प्रश्न विचारता येतो. परंतु हे प्रश्न तातडीने निर्माण झालेल्या सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर असले पाहिजे. अल्पसूचना प्रश्नांची सूचना देतांना तो अल्पसूचना प्रश्न म्हणून का देण्यात येत आहे याचे स्पष्टीकरणही सूचनेमध्ये नमूद करणे आवश्यक असते व त्यानंतर ज्या विषयावर प्रश्न विचारावयाचा आहे तो प्रश्न थोडक्यात व मुद्देसूदपणे विचारावा लागतो. मा. अध्यक्षांनी प्रश्न स्विकृत केल्यानंतर संबंधीत मंत्री उत्तर देण्यास तयार आहेत का, याबाबत या सचिवालयाकडून विचारणा केली जाते. संबंधीत मंत्र्यांच्या सोईनूसार कोणत्याही दिवशी प्रश्न त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येतो. अल्पसूचना प्रश्न हा तातडीचा असल्यामुळे तारांकित प्रश्नाच्या आधी घेतला जातो व या प्रश्नावरील चर्चेत तारांकित प्रश्नाप्रमाणे अनुपुरक प्रश्नोत्तरे होतात.[7]

3. **अतारांकित प्रश्न**

विधानसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना लेखी स्वरुपात उत्तर हवे असते अशा वेळी सदस्य अतारांकित प्रश्नाची सूचना देतात. असे प्रश्न व त्याची उत्तरे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतात. अशा प्रश्नांची सूचना देण्यासाठी कोणतीही मुदत नसते. अशा प्रकारच्या प्रश्नाचे उत्तर स्विकृत प्रश्न शासनाला प्राप्त झाल्यापासू 1 महिन्याच्या आत द्यावयाचे असते. ज्या प्रश्नात खास तक्रार नाही. केवळ माहिती हवी असते किंवा सांख्यिकिय माहिती विचारली असेल असे प्रश्नही सामान्यत: अतारांकित प्रश्न म्हणून स्विकृत केले जातात. तसेच जे प्रश्न तोंडी उत्तरासाठी तारांकित प्रश्नाच्या यादीत समाविष्ट होऊनही प्रश्नोत्तराचा तास समाप्त झाल्यामळे उत्तरीत होऊ शकत नाहीत. असे प्रश्न अतारांकित समजले जातात व त्यांची उत्तरे त्या दिवशीच्या कार्यवाहीत छापली जातात.[8]

**निष्कर्ष** :

1. संसदीय लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींना मिळालेले प्रमुख आयुध आहे.
2. विधिमंडळामध्ये लोकप्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांमुळे सरकारला जनतेच्या समस्या, प्रश्न व अपेक्षा कळतात.
3. विधिमंडळामध्ये मंत्र्यांच्या उत्तराच्या माध्यमातून जनतेला सरकारचे विविध धोरणे, कार्यक्रम, योजना, एकंदरीत प्रश्नाविषयी मत व बाजूची माहिती मिळते.
4. विधिमंडळ सदस्य विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून शासनाला दिशा देण्याचे व प्रशासन गतिमान करण्याचे कार्य करत असतात.
5. केंद्रीय व राज्यविधिमंडळात सामान्यत: जे प्रश्न विचारले जातात त्याचे तीन प्रकार पडतात.

**सारांश**:-

लोकशाही शासन पध्दती ही जगातील एक सर्वोत्तम शासन पध्दती म्हणून आज नावारुपास आली आहे. या शासन पध्दतीचे काही पुरावे आपणास भारतातील प्राचीन इतिहास पाहावयास मिळतात. वाढती लोकसंख्या वाढता भूप्रदेश यामुळे जगातील अनेक देशाने अप्रत्यक्ष लोकशाहीचा किंवा प्रातिनिधिक लोकशाहीचा स्विकार केला आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने संसदीय लोकशाहीचा स्विकार केला आहे. आज ब्रिटीश पार्लमेंटच्या धर्तीवर जगातील जवळपास 115 देशांनी प्रातिनिधिक लोकशाहीचा स्विकार केलेला असून देशातील राज्यकारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी वेगवेगळ्या संसदीय आयुधांचा वापर केला जातो. लोकशाही शासनव्यवस्थेत जनता ही सार्वभौम असते. त्यामुळे लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीला मंत्रीमंडळ हे जबाबदार असते. जोपर्यंत लोकप्रतिनिधी सभागृहाचा (विधानसभेचा) पाठिंबा



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College ... Hingoli



Issue 40 , Vol. 2 (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

मंत्रीमंडळाला असेल तोपर्यंतच मंत्रीमंडळ सत्तेवर राहू शकते. मंत्रीमंडळावर लोकप्रतिनिधीचे नियंत्रण राहावे यासाठी योग्य काम करणाऱ्या शासनाला पाठिंबा देणे, अयोग्य काम करणाऱ्या शासनाला बदलणे, त्यांना लोकहितवादी बनविणे, त्यांच्या चुकांबद्दल जाब विचारणे, धोरणात बदल करण्यास भाग पाडणे, लोकहिताचे निर्णय घेण्यास भाग पाडणे, शासनाच्या कारभारात पारदर्शकता निर्माण करण्यासाठी विधिमंडळ सदस्यांना प्रश्नोत्तराचा तास या संसदीय आयुधांचा वेळेनूसार वापर करता येतो. यामुळे लोकशाहीला बळकटी येते. शासनाच्या ध्येयधोरणासंबंधी तसेच जनकल्याणार्थ राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, प्रश्नांवर, धोरणावर विधिमंडळात साधक-बाधक चर्चा होते. चर्चेअंती निर्णय घेतले जातात. यातून विधिमंडळ सदस्य विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून शासनाला दिशा देण्याचे व प्रशासन गतिमान करण्याचे कार्य करत असतात.

**संदर्भसुची** :

1) गव्हाणे, डॉ. अजय, (2014), संसदीय लोकशाहीची आयुधे, नांदेड, क्रिएटिव्ह पब्लिकेशन, 109.
2) गव्हाणे, डॉ. अजय, (2014), संसदीय लोकशाहीची आयुधे, नांदेड, क्रिएटिव्ह पब्लिकेशन, 135.
3) गव्हाणे, डॉ. अजय, (2014), संसदीय लोकशाहीची आयुधे, नांदेड, क्रिएटिव्ह पब्लिकेशन, 142.
4) महाराष्ट्र विधानसभा नियम (2014), अकरावी आवृत्ती, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, मुंबई - 28.
5) गिरमे, के.टी., (1983), विधानसभा परिचय आणि कामकाज, व्दितीय आवृत्ती पुणे, विद्या प्रकाशन, 185.
6) कळसे, अनंत., (संकलन) (2015), भारतीय संविधानाची तौलानिक वैशिष्ट्ये व विधिमंडळ कामकाज, मुंबई, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय व राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा 16.
7) कळसे, अनंत., (संकलन) (2015), भारतीय संविधानाची तौलानिक वैशिष्ट्ये व विधिमंडळ कामकाज, मुंबइ, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय व राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा 16
8) कळसे, अनंत., (संकलन) (2015), भारतीय संविधानाची तौलानिक वैशिष्ट्ये व विधिमंडळ कामकाज, मुंबई, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय व राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा 17



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli.